| सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन<br>पोलीस विभाग | |
|---|---|---|
| दूरध्वनी क्र. ०२२-२४९२४७३४<br>Email :<br>addlcp.traffic@mahapolice.gov.in | | अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, बृहन्मुंबई यांचे कार्यालय, वाहतूक पोलीस मुख्यालय ८७, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०००३० |
| **जा. क्र. ३४३ / अपोआ/वाहतुक/तात्पुरती अधिसुचना/ २०२४** | | **दिनांक - २० /०९/२०२४.** |

**अधि.क्र. १६८/अपोआ/ वाहतूक/कोस्टल रोड/तात्पुरती अधिसुचना/२४, दि.२०/०९/२०२४.**

# अधिसुचना/आदेश

**ज्याअर्थी** धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मार्ग (कोस्टल रोड) हा वेगवान रहदारीसाठी बांधण्यात आलेला मार्ग दिनांक ११/०३/२०२४ रोजीपासून खान अब्दुल गफार खान मार्गाच्या बिंदु माधव जंक्शन ते मरिन ड्राईव्ह (प्रिन्सेस स्ट्रीट ब्रिज) पर्यंत दक्षिण वाहीनी ही वाहनांचे रहदारीसाठी अंशत: खुली करण्यात आली होती.

धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज मार्ग (कोस्टल रोड) हा मार्ग दिनांक २०/०९/२०२४ पासुन दररोज सोमवार ते रविवार सकाळी ०७.००वा ते रात्रौ २४.०० वा पर्यत खालील प्रतिबंधीत वाहने वगळून सर्व वाहनांना प्रवेश देण्यात येईल तसेच सदर मार्गावर वाहने थांबविण्यास तसेच प्रवाशांना उतरण्यास व छायाचित्र काढण्यास आणि चित्रीकरण करण्यास सक्त मनाई आहे. तशी कृती करत असल्याचे आढळुन आल्यास संबंधीतांविरुध्द कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

**त्याअर्थी** जनतेस पोहचणारा धोका, अडथळा व गैरसोय टाळण्यासाठी आणि तसा निर्देश देण्याकरीता **मी, एम. रामकुमार, भा.पो.से.,** अपर पोलीस आयुक्त, वाहतूक, बृहन्मुंबई मोटार वाहन अधिनियम १९८८ चे कलम ११५ (१९८८ चा नियम ५९) व शासकीय अधिसुचना क्र.एम.व्ही.ए/०५८९/सी.आर-१०६१/टी.आर.ए-२, एम.जी.जी. रोमन चार-ए दि. २०/०९/१९९०, पी ६६८ सुधारीत क्र. एमव्हीए ००१९६/८७१/सीआर-३७/ सीआरए-२, दि. २७/०९/१९९६ एम.जी.जी. रोमन चार- ए १९९६ ईएक्स पी. ३०७ यानुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून खालील याव्दारे वाहतूकीचे नियमन करण्याकरिता खालीलप्रमाणे तात्पुरती अधिसुचना निर्गमित करीत आहोत.

**अ) धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज (कोस्टल रोड) (दक्षिण वाहीनी)**

१) बिंदु माधव जंक्शन, २) रजनी पटेल चौक (लोटस जंक्शन)३) अमरसन्स गार्डन ते मरीन ड्राईव्ह.

**ब) धर्मवीर स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज (कोस्टल रोड) (उत्तर वाहीनी)**

१) मरीन ड्राईव्ह, २) अमरसन्स गार्डन, ३) रजनी पटेल चौक (लोटस जंक्शन), ते बांद्रा सी लिंक (राजीव गांधी सी लींक) .

**प्रवेश व संचार बंदी असलेली वाहने**

| | |
|---|---|
| १. | सर्व प्रकारची अवजड वाहने, ट्रेलर्स, मिक्सर, ट्रॅक्टर्स, जड मालवाहने (बेस्ट/एस.टी. बसेस/प्रवाशांना घेऊन जाणारी वाहने वगळून) तसेच सर्व प्रकारची मालवाहु वाहने |
| २. | सर्व प्रकारचे दुचाकी वाहने, सायकल व अपंगाचे मोटर सायकल्स/स्कुटर्स (साईड कारसह) |
| ३. | सर्व प्रकारची तीन चाकी वाहने |
| ४. | जनावरांकडून ओढण्यात येणाऱ्या गाडया, टांगा, हातगाडी |
| ५. | पादचाऱ्यांचा संचार |

क) वाहने वेगाने चालविण्यावर खालील प्रमाणे वेग मर्यादा निर्बंध घालण्यात येत आहे.

| अ.क्र. | ठिकाण | वेग मार्यादा (प्रती तास) |
|---|---|---|
| १. | सरळ मार्गावर | ८० कि.मि. |
| २. | बोगदयामध्ये | ६० कि.मि. |
| ३. | वळणाच्या ठिकाणी | ४० कि.मि. |
| ४. | कोस्टल रोड आणि सी-लिंक जोड रस्ता | ३० कि.मि. |

सदरचे आदेश दिनांक २०/०९/२०२४ रोजी सकाळी ०७.०० वा. पासून पुढील आदेशापर्यंत अंमलात राहतील.

सदर आदेश माझ्या सही व शिक्या निशी दिनांक २०/०९/२०२४ रोजी काढण्यात आले.

दिनांक :- २०/०९/२०२४
ठिकाण :- मुंबई.

( एम.रामकुमार ) भा.पो.से.
अपर पोलीस आयुक्त,
वाहतूक, मुंबई.

| सद्रक्षणाय खलनिग्रहणाय | सत्यमेव जयते<br>HOME DEPARTMENT | |
|---|---|---|
| Tel :- 022-24924734<br>Email :- addlcp.traffic@mahapolice.gov.in | | Addl. Commissionar of Police, Traffic, Mumbai. Traffic Police Head Quarter, 87, Sir Pochkhanwala Road, Worli, Mumbai – 400030. |
| **O.W. No. 343/TRF/Addl.CP./Coastal Road /Temporary Notification/24.** | | **Date: 20 /09//2024** |



**Notification No. 168/MTP/ADDL.CP./Coastal Road /TEMPORARY/2024, Dt. 20/09/2024.**

## Notification /Order

**WHEREAS** On 11th March 2024 Dharmveer Swarajya Rakshak Chhatrapati Sambhaji Maharaj Marg (Coastal Road) constructed for the fast traffic was partially opened for vehicular traffic, on Khan Abdul Gaffar Khan Road from Bindu Madhav Junction to Marine Drive ( Princess Street Bridge ) South Bound.

From 20/09/2024, Daily Monday to Sunday, morning 07.00 hrs to night 24.00 hrs. Dharmveer Swarajya Rakshak Chhatrapati Sambhaji Maharaj Marg (Coastal Road) will be open except below mentioned restricted Vehicles. It is strictly forbidden to stop vehicles and get down from vehicles also take pictures and videography by the passengers on the said route. Legal action will be taken if such action is found.

**THEREFORE**, In order to prevent danger, obstructions and inconvenience to the public, I, **M. Ramkumar, I.P.S.**, Addl. Commissioner of Police, Traffic, Mumbai in exercise of the powers conferred upon me under section 115 of Motor Vehicles Act -1988 ( Act No. 59 of 1988 ) read with Government Notification No. MVA 0589/CR-1061/TRA-2 Dated 19/05/1990 M.G.G. IV-A, dt 20/09/1990 p. 668 Amended by No. MVAO 0196/871/CR-37/TRA-2, dt.27/09/1996 M.G.G. IV-A, 1996 Ex. p. 307 do hereby order as under.

**Dharmveer Swarajya Rakshak Chhatrapati Sambhaji Maharaj Marg (Coastal Road)**

**A) South bound carriage way from Bindu Madhav Thackeray Junction, Rajani Patel Junction ( Lotus junction) & Amarsons Garden to Marine Drive.**

**B) North bound carriage way from Marine drive, Amarsons Garden & Rajani Patel junction ( Lotus junction ) upto Bandra Worli sea link ( Rajiv Gandhi sea link )**

## Vehicles with restricted entry and traffic.

| | |
|---|---|
| 1) | All types of heavy vehicles, trailers, Mixer, tractors, heavy goods vehicles (excluding BEST/ST buses/passengers carrying vehiles) and all goods carrier vehicles. |
| 2) | All types of two wheelers, Cycle and disable persons motor cycles/scooters (including side cars) |
| 3) | All types of three wheelers |
| 4) | Animal drawn carts, tangas, handcarts. |
| 5) | Pedestrians |

## C) the following speed limits are being imposed on speeding of vehicles.

| Sr. No | Place | Speed Limit (per hour) |
|---|---|---|
| 1) | On a straight road | 80 km. |
| 2) | In the tunnel | 60 km. |
| 3) | At the turning poing | 40 km. |
| 4) | Coastal Road & Sea Link merging point | 30 km. |

The said order dated 20/09/2024 at 07.00 am will remain in effect until further orders.

Issued under my Seal and Signature on 20/09/2024.

Place- Mumbai.

Date :- 20/09/2024.

**( M. Ramkumar ), I.P.S.**
Addl. Commissioner of Police,
Traffic, Mumbai.